# निवेदन

मी, या निवेदनाद्‌वारे जाहीर करते की, **जयंत नारळीकर यांच्या 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या कादंबऱ्यांचा अभ्यास** हा लघुप्रबंध माझे संशोधन मार्गदर्शक डॉ. शिवलिंग गंगाधर मेनकुदळे यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वत: लिहिला असून सदर लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विषयातील एम. फिल. (मराठी) पदवीसाठी सादर केला आहे. हा लघुप्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठास पदवीसाठी किंवा अन्य पदविकेसाठी सादर करण्यात आलेला नाही.

अभ्यासक

**(कु.मोहिते रूपाली वसंतराव)**

स्थळ - सातारा

दिनांक - ०५ - ०८-२०११

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु. रूपाली वसंतराव मोहिते यांनी मराठी विषयातील एम. फिल. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे सादर करावयाच्या **जयंत नारळीकर यांच्या 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या कादंबऱ्यांचा अभ्यास हा** लघुप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. कु. रूपाली वसंतराव मोहिते यांनी लिहिलेला लघुप्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनावर आधारित आहे. हा लघुप्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठास पदवीसाठी किंवा अन्य पदविकेसाठी सादर करण्यात आलेला नाही.

सदरचा लघुप्रबंध विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

मार्गदर्शक

शिवलिंग मेनकुदळे

**(डॉ. शिवलिंग गंगाधर मेनकुदळे)**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

स्थळ - सातारा

दिनांक - ०५-०८-२०११

Prin- J.G.Jadhav
Chhatrapati Shivaji College,
Satara.

# CERTIFICATE

This is to certify that, **Miss. Mohite Rupali Vasantrao**, of this college, was a regular student of M.Phill.(Marathi) during the academic year 2009 to2010. To the best of my knowledge he bears a good moral character.

Principal
Chhatrapati Shivaji College, Satara

Place – SATARA

Date – 05-08-2011

# मनोगत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत एम. फिल. (मराठी) पदवीसाठी लघुप्रबंधाच्या स्वरूपात मांडण्यासाठी जयंत नारळीकर यांच्या 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या कादंबऱ्यांचा अभ्यास हा विषय निवडला आहे. तसे पाहता नारळीकरांचा परिचय अगोदर पासून होताच. ते एक चांगले शास्त्रज्ञ आहेत, त्याचबरोबर चांगले लेखकही आहेत, हे माहित होते. त्यांची 'प्रेषित' ही कादंबरी वाचली आणि ती मनाला चटका लावून गेली. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांचा एम. फिल. संशोधनासाठी अभ्यास करावा अशी मनात इच्छा निर्माण आणि डॉ. शिवलिंग मुनकुदळे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनाची रूपरेखा तयार केली. आज हा अभ्यास पूर्णत्वाकडे जात असताना मनाला अतीव आनंद होत आहे.

हा अभ्यास करत असताना माझे मार्गदर्शक, माझे सर्व गुरूवर्य, ग्रंथालय, सहकारी, नातलग या सर्वांच्या माझ्यावरील स्नेहाचे या क्षणी स्मरण होत आहे. या सर्वांचा माझ्या पाठीवरती हात नसता तर माझ्यासारख्या विदयार्थ्याकडून हे संशोधन कार्य पूर्णत्वास गेलेही नसते. याची मन:पूर्वक जाणीव आहे.

रयत शिक्षण संस्थेचे सचिव व छ. शिवाजी कॉलेजचे प्राचार्य जे. जी. जाधव साहेब, सहसचिव जी. एस. खोत सर, मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी पाटील, डॉ. शिवलिंग मेनकुदळे (मार्गदर्शक), प्रा. सौ. मानसी लाटकर, प्रा. डॉ. सौ. अर्चना चव्हाण, प्रा. डॉ. सुभाष आहेर, प्रा.डॉ. सौ. कांचन नलावडे,श्री. नंदकुमार शेडगे आणि सदर प्रबंधाची आकर्षक बांधणी करणारे साताऱ्चे श्री. मुकुंद ढवळे व त्यांचे सर्व सहकारी, कुटुंबीयांचा तसेच सर्व सहकारीपरिवार आणि हितचिंतकांचे मनापासून शतश: आभार.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# भूमिका

डॉ. जयंत नारळीकर यांना संपूर्ण भारतात एक प्रज्ञावंत शास्त्रज्ञ, एक गणीततज्ज्ञ म्हणूना ओळखले जाते. वैज्ञानिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे. सारे आयुष्य त्यांनी या कारणासाठी खर्च केले आहे. आपल्या कुशाग्र बुध्दीच्या सहाय्याने त्यांनी विज्ञानाच्या क्षेत्राात नवनवे सिध्दांत प्रस्थापित केले आहेत. आपला देश वैज्ञानिक क्षेत्रात नेहमीच आघाडीवर असावा ही इच्छा बाळगून त्यांनी स्वतःला त्यात झोकून दिले आहे. देशाचे अर्थकारण, शेती, उदयोग, शिक्षण, वाहतूक या सर्वच क्षेत्रात प्रगती व्हावयाची असल्यास देशाने वैज्ञानिक क्षेत्राच्या विकासाकडे जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे. केवळ विज्ञानाच्या सहाय्याने देशात क्रांती घडवून आणता येते यावर त्यांची श्रध्दा आहे. देशात अंधश्रध्देचे जे प्राबल्य आहे ते नष्ट करून देशातील प्रत्येक नागरीक हा विज्ञाननिष्ठ व्हावा यासाठी त्यांची अखंड धडपड सुरू आहे. त्यासाठी मिळेल त्या प्रसार माध्यमांचा वापर ते करीत आहेत. लेखन आणि भाषण याव्दारेही त्यांचे कार्य अविरतपणे सुरू आहे.

विज्ञान साहित्यावर आजपर्यंत बराच अभ्यास झालेला आहे. परंतु, जयंत नारळीकर यांच्या सर्वच विज्ञान कादंबऱ्यांचा अभ्यास झालेला नाही. त्यांच्या 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या कादंबऱ्यांचा अभ्यास आजच्या वाढत्या तंत्रज्ञानाच्या युगात गरजेचा वाटतो. त्यांच्या साहित्यकृतीवर फारच थोडया समीक्षकांनी समीक्षा केल्याचे आढळते. त्यात प्रामुख्याने यशवंत पाठक, निरंजन घाटे, डॉ. अनिल संपकाळ, दुर्गा भागवत अशा लोकांनी समीक्षा केलेली आहे.

जयंत नारळीकरांच्या कादंबऱ्यांचा विचार करता त्यांच्या दोन्हीही कादंबऱ्या मराठी विज्ञान साहित्याती महत्त्वपूर्ण कादंबऱ्या वाटतात. मात्र त्यांचा अभ्यास आजवर झालेला नाही. तो होणे महत्त्वाचे वाटले. त्याचबरोबर वैज्ञानिक कथा-कादंबऱ्यांवर संशोधनात्मक दृष्टिकोनातून प्रकाश टाकला तर समाजाची विज्ञानविषयक दृष्टी अधिक विकसित होऊ शकेल असे वाटले, म्हणून या दोन्ही

कादंबऱ्याचा अभ्यास करण्याची भूमिका होती. मराठी साहित्यात विज्ञान साहित्य तुलनेने कमी आहे. परंतु नारळीकरांनी आपल्या लेखनातून लोकांना वेगळ्या विश्वात नेहुन ठेवले आहे. सर्वसामान्य माणसांच्या मनात विज्ञानाबद्दल आदर, तेवढीच जिज्ञासा निर्माण व्हावी, त्यांची वैज्ञानिक दृष्टी व्यापक स्वरूपात विकसित व्हावी. निश्चित गृहित तत्वाच्याआधारे त्यांनी सर्व गोष्टी तपासून पहाव्यात ,अंधश्रध्देच्या आणि बुवाबाजीच्या कचाटयातून त्यांची सुटका व्हावी आणि समाजात त्यांना निखळ भयमुक्त समाजजीवन जगता यावे. यासाठी नारळीकरांनी लेखन केल्याचे दिसून येते. त्यांचे हे लेखन समाजाला नक्कीच प्रेरणादायक ठरेल अशी आशा वाटते.

'अभयारण्य' या कादंबरीत त्यांनी मानवाला लागलेल्या विविध शोधांचा आढावा घेतलेला आहे. त्या शोधांमुळे मानवी जीवन किती सुखाचे झाले आहे याचे वर्णन त्यांनी केले आहे. त्याचबरोबर तंत्रज्ञानाचा वापर वाढून मानव दिवसेदिवस त्याच्या आहारी जात आहे व स्वतःचा विनाश ओढवून घेत आहे. याची जाणीव त्यांनी या कादंबरीत करून देऊन मानवाला भविष्यातील संकंटापासून सावध करण्याचा प्रयत्न केला आहे. 'प्रेषित' या कादंबरीत त्यांनी परग्रहसंस्कृती पृथ्वीवर येण्यास आतुर असेल आणि त्यांच्या आगमनाने पृथ्वीवरिल लोकांच्या जीवनात फरक पडेल हे दाखवून दिले आहे. परग्रहसंस्कृतीच्या मानाने मानवाला अजून खूप प्रगती करायला हवी असेही त्यांनी दाखवून दिले आहे. भविष्याचा शास्त्रीय सत्याचा आधार घेऊन अतिशय चांगल्या प्रकारे वेध याठिकाणी त्यांनी घेतलेला दिसून येतो. म्हणून या कादंबऱ्या वेगळ्या वळणाच्या आहेत. आजवर अशाप्रकारचे फारसे लेखन झालेले नाही. तसे होणे महत्त्वाचे वाटते. म्हणून या कादंबऱ्यांचा अभ्यास होणे महत्त्वाचे वाटते. त्यामुळे संशोधनासाठी हा विषय निवडून अभ्यास केला आहे. हे संशोधन इतर अभ्यासकांना मार्गदर्शक ठरेल अशी माझी अपेक्षा आहे.

**डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
मार्गदर्शक

**रूपाली मोहिते**
अभ्यासक



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | भूमिका | V |
| १. | विज्ञान कादंबरी : स्वरूप व वाटचाल | १ - २५ |
| २. | जयंत नारळीकर यांच्या वाङ्:मयीन व्यक्तिमत्त्वाची जडणघडण | २७ - ५३ |
| ३. | 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या विज्ञान कादंबऱ्यांची आशयसूत्रे | ५५ - ९६ |
| ४. | 'प्रेषित' आणि 'अभयारण्य' या विज्ञान कादंबऱ्यांचे अभिव्यक्ती व वाङ्:मयीन विशेष | ९७-११४ |
| ५. | उपसंहार | ११७-१२१ |
| | परिशिष्ट्ये | १२३-१२७ |
| | १. संदर्भ ग्रंथ सूची | १२३ |
| | २. जयंत नारळीकर यांचा फोटो व पुरस्कार | १२५ |
| | ३. जयंत नारळीकर यांची वाङ्:मय संपदा | १२७ |

# अर्पण पत्रिका

माझे शिक्षण पूर्ण होण्यासाठी
ज्यांनी अविरत कष्ट उपसले
त्या माझ्या सासू-सासऱ्यांना,
पतिस,
ज्यांनी मला आधार दिला,
माझ्या कार्यास प्रोत्साहन दिले
त्या आई-वडिलांना, दीर व जाऊ,
नणंद, भावंडांना,
संशोधन कार्यास मोलाचे
मार्गदर्शन व प्रेरणा देणाऱ्या
माझ्या गुरुवर्यांना,
माझ्या यशाची दखल
घेणाऱ्या सहकारीपरिवारास
आणि माझ्या धनू व उमंगास .......

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.